# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांक:18.06.2024 वार:मंगळवार

---

1.पंतप्रधानांच्या हस्ते पीएम किसान योजनेच्या लाभार्थ्यांना १७वा हप्ता आज वितरीत होणार
2.पश्चिम बंगालमधील रेल्वे अपघातात नऊ जण ठार आणि किमान ६० जण जखमी; मृतांच्या निकटवर्तीयांना मदत जाहीर
3.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नीतीन गडकरी यांच्याद्वारे जम्मू आणि काश्मीरमधील रस्ते आणि महामार्ग प्रकल्पाच्या कामांचा आढावा
4.प्रियंका गांधी वाड्रा वायनाडमधून लोकसभेची पोटनिवडणूक लढवणार
आणि
5.मुसळधार पावसामुळे सिक्किमध्ये अडकलेल्या पर्यटकांची सुटका

**<u>शेतकरी-हप्ता</u>**
पीएम किसान योजनेच्या लाभार्थ्यांना १७वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज वाराणसी इथून वितरीत करण्यात येईल. ९ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना एकंदर २० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी वितरीत केला जाईल. शेतीविषयक कामांसाठी मदतनीस म्हणून प्रशिक्षण घेतलेल्या बचत गटातील महिलांना ३० हजार कृषी सखी म्हणून प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील. ५० निवडक कृषी विकास केंद्रांवर विशेष उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. PM-KISAN योजना 24 फेब्रुवारी 2019 रोजी सर्व जमीनधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी,शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढीसाठी सुरू करण्यात आली. याअंतर्गत २ हजार रुपयांचा हप्ता ४ महिन्यातून एकदा असे एकंदर सहा हजार रुपये देशभरातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येतात. आत्तापर्यंत देशभरातील 11 कोटींहून अधिक शेतकऱ्यांना 3 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे.

**<u>रेल्वे-अपघात</u>**
पश्चिम बंगालमधील न्यू जलपाईगुडी स्थानकाजवळ काल सकाळी आगरतळा - सियालदाह कांचनगंगा एक्सप्रेस मालगाडीला धडकल्यानं नऊ जण ठार आणि किमान ६० जण जखमी झाले. न्यू जलपाईगुडीपासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर असलेल्या रंगपाणी रेल्वेस्थानकानजिक दोन गाड्यामध्ये धडक झाली, त्यामुळे एक्सप्रेस गाडीचे मागील दोन डबे रुळावरून घसरले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या निकटवर्तीयांना पंतप्रधान सहायता निधीतून प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनीही या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं असून जखमींना जलद बरे वाटावं यासाठी प्रार्थना करत असल्याचं आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल अपघात स्थळाला भेट दिली आणि मदत आणि बचावकार्याची पाहणी केली. तसंच रुग्णालयात जावून जखमींची चौकशी केली. मृतांच्या निकटवर्तीयांना १० लाख रुपये, गंभीर जखमींना अडीच लाख रुपये आणि किरकोळ जखमींना ५० हजार रुपयांची मदत मंत्रालयाच्या वतीनं देणार असल्याची घोषणा रेल्वे मंत्र्यांनी यावेळी केली. सिलीगुडीमध्ये काल सकाळपासून मुसळधार पाऊस पडत होता, त्यामुळे मदत आणि बचाव कार्यात दिवसभर अडथळे आले. रेल्वेगाडी आगरतळाहून सियालदहला जात असताना सकाळी नऊच्या सुमारास हा अपघात झाला. त्यामुळे या मार्गावरील लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या होत्या.

**<u>गडकरी</u>**
केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नीतीन गडकरी यांनी काल जम्मू आणि काश्मीरमधील रस्ते आणि महामार्ग प्रकल्पाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी श्रीनगर इथं राजभवनमध्ये स्वतंत्र बैठक घेतली. यावेळी या भागात अत्यंत खर्चीक अशी पायाभूत सुविधा उभारणीची आणि रस्ते प्रकल्पांची कामं सुरू केल्याबद्दल जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गडकरी यांचे आभार मानले. आम्ही जम्मू आणि काश्मीरच्या मजबूत आणि उज्ज्वल भवितव्यासाठी अत्यंत समर्पित भावनेनं काम करीत आहोत. या नव्या प्रकल्पामुळे या परिसरात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या असून प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लावला आहे, असं सिन्हा म्हणाले. गडकरी यांनी यावेळी परिसरात सुरू असलेल्या महत्त्वाच्या सहा रस्ते प्रकल्पाचा आढावा घेतला. त्याबाबत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचनाही दिल्या.

**<u>वीज</u>**
वीजजोडणी तसंच वीजबिलासंदर्भात ग्राहकांनी आपली माहिती अर्थात KYC अद्ययावत करावी अशा प्रकारची फसवणूक फोनद्वारे होत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर दूरसंचार विभागानं नागरिकांच्या सुरक्षेसाठी कारवाई सुरु केली आहे. सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणुकीमध्ये गैरवापर झाल्याच्या तक्रारी असलेले, देशभरातील 392 मोबाइल संचांच्या सेवा बंद करण्याचे निर्देश सर्व दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्यांना दिले आहेत. या संचांशी जोडलेल्या 31 हजार 740 मोबाइल कनेक्शनची पुन्हा पडताळणी करण्याचे निर्देशही दुरसंचार मंत्रालयानं दिले आहेत. नव्यानं शहानिशा करताना त्रुटी आढळल्यास संबंधित मोबाईल आणि हँडसेटच्या सुविधा तत्काळ बंद करण्यात येतील असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

प्रियंका
काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी केरळमधल्या वायनाड मतदारसंघातील आपल्या  खासदारपदाचा राजीनामा देणार असून त्यांचा जागी पक्षाच्या महासचिव प्रियंका गांधी वाड्रा वायनाडची पोटनिवडणूक लढवणार आहेत. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत गांधी यांनी काल ही घोषणा केली. राहुल गांधी यांनी यंदा वायनाड आणि रायबरेली या दोन मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढवली होती. दोन्ही मतदार संघातून ते मोठ्या मताधिक्य मिळवून निवडून आले आहेत.

**गोरे-करार**
इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्र आणि सुप्रसिध्द चित्रकार दिपक गोरे यांच्या दरम्यान काल नवी दिल्ली इथं सामंजस्य करार करण्यात आला. गोरे यांनी रेखाटलेली छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित १ हजार १५ तैलचित्र  या कला केंद्राला दान करण्यात येणार आहेत. ही चित्रं मिळाल्याबद्दल केंद्राचे सदस्य सचिव डॉ. सच्चिदानंद जोशी यांनी आनंद व्यक्त केला. हा अनमोल कलेचा ठेवा तसंच महत्त्वपूर्ण ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा भावी पिढ्यांसाठी जतन करण्याची आपली वचनबद्धता आहे. हा वारसा अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे.असं गोरे यांनी यावेळी बोलताना सांगितलं.  छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याला साडेतीनशे वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या महिन्याच्या सुरुवातीला इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रात प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं यामध्ये गोरे यांच्या तैलचित्रांचा समावेश होता.

**पर्यावरण संवर्धन कायदा**
नैसर्गिक अधिवासात राहणाऱ्या पशु-पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास अबाधित राहावा या हेतूने करण्यात आलेल्या बहुचर्चित पर्यावरण संवर्धन कायद्याला युरोपीयन संघातील पर्यावरण मंत्र्यांच्या गटाने, मंजूरी दिली. जंगलांचं संवर्धन, ओसाड जमीन ओलिताखाली आणणं आणि नद्यांना मुक्तवाहिनी करणं  हा या कायद्याचा उद्देश आहे. युरोपियन संघातील 66 टक्के लोकसंख्येचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या २० सदस्यांनी या कायद्याच्या बाजूने मतदान केलं.   2030 पर्यंत युरोपियन संघातील जमिनी आणि सागरी क्षेत्रांपैकी किमान 20 टक्के क्षेत्र पुनःस्थापित करणं  आणि पुनःस्थापनेची  आवश्यकता असलेल्या सर्व परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण हे या कायद्याचं उद्दिष्ट आहे. आकडेवारीनुसार, सुमारे 80 टक्के अधिवासांची अवस्था बिकट आहे. याव्यतिरिक्त, मधमाश्या आणि फुलपाखरांच्या 10 टक्के प्रजाती नष्ट होण्याचा धोका आहे.  मातीच्या गुणवत्तेतही ७० टक्क्यांनी घट झाली आहे.

**एनएसए**
अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवन यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली इथं भेट घेतली. सेमिकंडक्टर्स, कृत्रिम बुध्दीमत्ता, दुरसंचार, संरक्षण, खनिजं, अवकाश आदी मुद्यांवर यावेळी चर्चा झाली. सर्व क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय भागीदारी वृंध्दीगत होत असल्याबद्दल मोदी यांनी समाधान व्यक्त केलं तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. जागतिक हितासाठी भारत-अमेरिका सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी भारत वचनबद्ध आहे. असंही मोदी यांनी यावेळी सांगितलं.  G7 देशांच्या शिखर परिषदेत राष्ट्राध्यक्ष बायडन यांच्याशी झालेली चर्चा सकारात्मक झाल्याचंही ते म्हणाले.

**मणिपुर**
मणिपुरमधील सुरक्षास्थितीचा आढावा घेण्यासाठी गृहमंत्री अमित शहा यांनी काल उच्च स्तरीय बैठक घेतली. मणिपूरमध्ये शांतता आणि समरसता अबाधित राखण्यासाठी सुरक्षा दलांचं नियोजन करावं असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले, गरज भासल्यास सैन्यदलाची संख्या वाढवण्यात येईल, हिंसाचार करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश शहा यांनी दिले. गृह मंत्रालयाचा  मणीपुर सरकारला  पाठिंबा सन, लवकरच मेतैई आणि कुकी या दोन्ही गटांशी चर्चा करेल असंही शहा यावेळी बोलताना म्हणाले.

**T20 विश्वचषक**
T20 विश्वचषक स्पर्धेत त्रिनीदाद इथं झालेल्या सामन्यात न्युझीलंडनं पापुआ न्युगिनीवर ७ गडी राखून विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय न्युझीलंडनं घेतला आणि पापुआ न्युगिनी संघाला १९ षटकं आणि ४ चेंडूत ७८ धावांवर रोखलं. त्यानंतर १२ षटकं आणि २ चेंडूत हे ७९ धावांचं लक्ष्य गाठत हा विजय मिळवला. स्पर्धेच्या सुपर-एट फेरीत आठ संघ दाखल झाले असून उद्यापासून या फेरीचे सामने होतील.

**पर्यटक सुटका**
सिक्कीममध्ये लाचुंग इथं पुरात अडकलेल्या पर्यटकांना कालपासून मंगन जिल्ह्यातून अन्यत्र हलविण्याचं काम सुरू झालं. दरम्यान,  प्रतिकूल हवामानामुळे पर्यटकांची हवाई मार्गाने सुटका करण्याच्या प्रयत्नांना काल यश आलं नाही.

जिल्हा प्रशासनानं राज्य पोलिस दल आणि वन विभागाचे कर्मचारी, राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दल, स्थानिक ग्रामपंचायती आणि स्वयंसेवकांच्या तुकड्या यांच्या सहकार्यानं पहिल्या टप्प्यात नऊ पर्यटकांना बाहेर काढलं.  काल संध्याकाळी सहाच्या सुमाराला सुटका केलेल्या 55 पर्यटकांची दुसरी तुकडी मंगन इथं पोहोचली.  अन्नपाण्याचा पुरेसा साठा, पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य  आणि यंत्रणांमधील सुयोग्य समन्वय यामुळे पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढणं शक्य झालं आहे.  आज हवामान अनुकूल असल्यास उर्वरित पर्यटकांनाही  हवाई मार्गानं अन्यत्र हलविण्यात येणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**